## गाणेश्वरी मनोबोध–श्लोकसमूह

## ।। मनाचे श्लोक ।।

## ।। श्रीअंकुशधारीमहाराजकृत मनोबोधश्लोकसमूह ।।
## (अर्थात गाणेशी मनाचे श्लोक–भुजंगप्रयात)

श्री गणेशायनम: । श्रीमद्‌गणेशयोगीन्द्राचार्यवर्याय नम: ।
श्रीमत्सद्‌गुरुगणेशाय नम: । श्रीमद्‌गाणेशाचार्यगुरुभ्यो नम:।

नमू योगनाथा मयूरेश्वराते । कृपासागरा चित्स्वरूपा पराते । नमू सिद्धि–धी–शारदा–सद्‌गुरूते : मन:किल्मिषू लेशही बा नुरूते ।।१।। मना तूजला एक बा प्रार्थितो मी । नको व्यर्थ बापा करू हाय मी मी । नको रे नको तू शिरू या भवांत । खरे सांगतो सौख्य ना वैभवात ।।२।। मना आडमार्गी शिरू तू नको रे । सदा मार्ग तो शुद्ध तू आदरी रे । नको बाळगू व्यर्थ संसारचिंता । मना आठवी सर्वदा एकदंता ।।३।। मना सत्यपंथे सदा चालणे रे । मना गोडही सत्य ते बोलणे रे । नको भीड खोटी स्वचित्तात ठेवू । नको इन्द्रिये स्वैर ती होऊ देऊ ।।४।। मना नीतिपंथासि सोडू नये रे । मना लेशही पाप जोडू नये रे । मना दुर्जनाच्या न वाऱ्या राहावे । मना आपुल्या सार्थकत्वा पहावे ।।५।। मना सेविजे नित्य या भक्तिपंथा । तरी तोष होईल बा एकदंता । मना सर्वदा निंद्य कर्मा त्यजावे । मना आदरीं वंद्य ते सर्वभावे ।।६।। नको त्या दुराशा कधी आदरू रे । नको सर्वदा

पापबुद्धी धरू रे । नको वैषयी कल्पना बाळगू रे । विकारे जगी होय तुझी छिथू रे ।।७।। सदा सत्य संकल्प ठेवी मनात । तसे दुष्ट संकल्प सोडी वनात । मना सारसारार्थ चित्ती धरावा । मना मोरया अन्तरी आदरावा ।।८।। प्रभाती गणाधीश नित्य स्मरावा । सदाचार हा आदरे बा धरावा । असे नित्य जो वागवीतो मनात । मना धन्यता तोचि पावे जनात ।।९।। मनी होय संकल्प जो वैषयीक । तया साधु ते बोलती काम एक । करी तो जनी जाण नाना विकारू । मना सज्जना त्या नको अंगीकारू ।।१०।। मनाची जिथे सर्वथा प्रीति राहे । तिथे क्रोधही निश्चये राहताहे । करी क्रोध तो सर्वथा धुळधाणी । मना सज्जना त्यासि चित्तांत नाणी ।।११।। असंतोष जो प्राप्तिचा होय जीवा । तया लोभ ऐशा बुधी दत्त नावा । मना सज्जना लोभ हा घातकारी । नको रे नको सेवू तो दुष्ट भारी ।।१२।। जगी मी-ममत्वादि-धी प्राप्त योगे । जये मोह तो जाण बा लागवेगे । महाशत्रु हा मोह बापा जनांचा । त्यजी बोध तू ऐक बा सज्जनांचा ।।१३।। सदा मीच मोठा सुखी सर्व लोकी । नसे मत्समे भूमी-पातळ-नाकी । अशा लक्षणी दुर्मदु ओळखावा । मना घातकी सत्वरे हा त्यजावा ।।१४।। परोत्कर्ष पाहुनिया खेद होय । सदा तद्विनाशी धरी यत्न-सोय । तसा दुष्ट हा मत्सरू पापखाणी । त्यजी रे मना ऐक हे संतवाणी ।।१५।। मना सर्वदा धैर्य ते वाढवावे । जनांचे सुअन्याय सोशीत जावे । जरी तीक्ष्ण वाणी तुला कोणी बोले । तरी सद्विवेके सहावी सुवेळे ।।१६।। असे बोलणे तू मना नित्य ठेवी । जनांच्या सदा सौख्य होईल जीव । जगी मान्यही सर्वथा होई जाण । खरे सांगतो अन्यथा चित्ति नाण ।।१७।। मना सर्वदा सत्क्रिया आदरावी । जिने सोडिता देह, कीर्ती उरावी । स्वये चन्दनासारिखे त्वा

झिजावे । परी सज्जनाच्या मना तोषवावे ।।१८।। नको रे मना तू अघे द्रव्य जोडू । नको रे नको सर्वथा नीति सोडू । अति स्वार्थबुद्धी मना पापमूळ । करी शेवटी ते तुझी जाण धूळ ।।१९।। मना कर्म ते जाण कोणा चुकेना । कुणी कर्मभोगांतुनी या मुकेना । पहा राम विख्यात तो रावणारी । परी दु:ख भोगी अरण्यात भारी ।।२०।। कसा धर्ममूर्ती जगी धर्मराजा । नळासारिखा पुण्यवान् कोण दूजा । हरिश्चन्द्रही ख्यात साऱ्या जगात । परी दैव त्यांचा करी पूर्ण घात ।।२१।। म्हणूनी मना खेद हा सर्व सोडी । स्वभावलस्थ ती रोकडी भोग्य जोडी । विवेके अशा शांत होऊनि राही । समाधान बा याविणे अन्य नाही ।।२२।। मना पापकर्मासि जोडू नको हो । मना पुण्यमार्गासि सोडू नको हो । जगी पाप हे सर्वथा दु:खमूळ । तसे पुण्य ते जाण बा सौख्यमूळ ।।२३।। मना खंत मानू नको संकटाची । गणेशी धरी प्रीति हो साह्य तेची । शरीरा घडे दु:ख ते सौख्य मानी । स्वरूपी सदास्वस्थ व्हावे शमानी ।।२४।। मना शांतचित्ते करी रे विचारा । जगी या कुणा सर्वथा सौख्यथारा । जसे त्वा पुरा संचिले पुण्य-पाप । तयासारिखे भोगिशी सौख्यताप ।।२५।। म्हणूनी मना ऐक माझ्या वचाते । नको दु:खशोकादि आणू मनी ते । अरे देहबुद्धी विवेके त्यजावी । सदा स्वांतरी ढुंढिमूर्ती भजावी ।।२६।। कुणा थोरवी कार्तवीर्यासमान । जये रावणा बांधिले बा बळानं । परी हा गिळी काळ त्यालाहि पाही । म्हणूनी मना सोडि रे कल्पना ही ।।२७।। जगी जन्म जीवा घडे कर्मयोगे । सरे त्या क्षणी काळ ने त्यासि वेगे । पहा रामकृष्णादि जे थोर थोर । तया शेवटी ग्रासि हा काळचोर ।।२८।। असंख्यात की जन्मले जीव लोकी । असंख्यात मेले न संख्या तया की । चिरंजीव हे मानणे

पूर्ण खोटे । अकस्मात की लागणे मृत्युवाटे ।।२९।। अरे जाण तू सत्य हा मृत्युलोक । अहंतागुणे मानिती हर्षशोक । क्षणे प्राण हा जाई जो बा निघून । वृथा तोवरी मी–ममत्वादि मान ।।३०।। मरे बाप तो पुत्र हो शोककारी । मरे पुत्र तो शोक–भाजा सुनारी । जगी लोभ हा वाढवी वासनेते । मना तीच रे वासना जन्म घेते ।।३१।। भवीतव्य ते होय काळानुसार । वृथा मानसी होत चिंताविचार । घडे कर्मयोगे जनी भोग नाना । परी व्यर्थची खेद होतो अजाणा ।।३२।। गणेशाविणे सर्वही आस खोटी । नको मानवी कीर्ति गाऊच मोठी । जया वेदशास्त्रे पुराणादि गाती । तया वर्णिता हे तनू धन्य होती ।।३३।। (इतिकर्मभोग–अनिवार्यता–विवेक–संतोषस्थिति–उपदेशः ।)

असद्‌वाक्य वाणी कधी ना वदो रे । सदा सर्वदा सत्य चित्ती धरी रे । असे निश्चये सत्य ते आदरावे । असत्या तरी दूरदेशी त्यजावे ।।३४।। अरे काय ते गर्भिचे दुःख बोलू । अवाच्या तया कासया व्यर्थ खोलू । मना हिंपुटी फार होशी तिथे रे । पचे नर्ककुंडी अधोमूख रे रे ।।३५।। मना वासना या भवी सोडिशील । तरी निश्चये मुक्ति ती जोडिशील । तशी कामना त्यागिता काम होई । मना गर्भजा यातना सर्व जाई ।।३६।। मना हीत माझे जरी इच्छिशील । तरी चिंतनी तू धरी चन्द्रभाल । गणाधीश तो विष्णुशर्वादिकांचा । प्रभू उद्धरी तूजला एक साचा ।।३७।। मना या जनासी नको व्यर्थ बोलू । नको मानसी मोरयावीण तोलू । तुला सोडवी कोण देहान्तकाळी । स्मरी रे घडीने घडी चन्द्रमोळी ।।३८।। जनांच्या सवे व्यर्थ जे बोलणे रे । गणेशाविणे व्यर्थ ते शीणणे रे । नसो पापिणी ती अहंता मनात । सदा ढुंढिचे नाम यो आननांत ।।३९।। तुझी वृत्ति हे चंचला फार बापा । सदा

पावशी त्याच योगे सुतापा । करी प्रज्ञया निश्चली वास नेटे । मना विघ्नपी चंचला वृत्ति आटे ।।४०।। जिथे हो निजानन्दतापूर्णराशी । अती आदरे लक्ष ठेवी तयाशी । कुतर्का विवेकेचि छेदी प्रयत्ने । धरी विघ्नपी प्रीति सत्स्वार्थमाने ।।४१।। कितीही कुठे हिंडशी सौख्यहीन । हिताचा नसे लेश, होशील दीन । विवेके करी बोध बा शेमुषीशी । सदा लीन होती जये विघ्नपाशी ।।४२।। तुला मुख्य हे सांगतो एक तत्त्व । मयूरेश्वरी स्थापि रे आत्मसत्व । दिनानाथ चिन्तामणी ब्रीद गाजे । मना विघ्नपी सर्वदा चित्त दीजे ।।४३।। मना सांगतो सार हे एक जीवी । खरे हीत ते मानसी नित्य भावी । मयूरेश्वरावीण बोलो नको रे । निजध्यास हा अन्तरी आदरी रे ।।४४।। मना या जनी आदरी मौन मुद्रा । कथा मोरयाची करी नित्य भद्रा । न जेथे गणेशान ते स्थान सोडी । सुखार्थे धरी काननी नित्य गोडी ।।४५।। जिथे होतसे बा समाधान-भंग । अहंता भरे सोडि रे तो कुसंग । नसे स्वार्थ ऐशा कुसंगे खरा रे । गणेशान जेथे सुटे आखरा रे ।।४६।। मना मोरयावीण जो काळ गेला । तुवा ते क्षणी आपुला घात केला । गणेशाविणे शीण तो सर्वथाच । नको जाणत्या सांगणे सूज्ञ तोच ।।४७।। मना बोलणे हे नसे गोड माझे । परी सत्य मी सांगतो हीत तुझे । अरे दृष्ट ते नष्ट होईल सारे । म्हणूनी सदा विघ्नराजासि गा रे ।।४८।। तनूपोषणी यत्न केले अपार । परी काळ हा ठेविना रे उधार । तरी हो मना भक्त तू मोरयाचा । नको शोक बापा करू या भवाचा ।।४९।। भवाच्या भया कासया वागवीसी । त्यजी धाक रे धीर देई जिवासी । मयूरेश्वरासारिखा पाठिराखा । नुपेक्षी जरी कोपला काळ-काका ।।५०।। दिनानाथ हा ढुंढि पाशादिधारी । जया पाहता काळ हो भीत भारी । मना

सत्य की शास्त्रपूता सुवाणी । उपेक्षी न हा ढुंढि भक्ताभिमानी ।।५१।। स्वगीतेत जो ब्रीद बोधी स्वकीय । स्वभक्ती सदा भीतिती जाण हेय । पुरी निर्जरी बैसवीली विमानी । उपेक्षी न हा० ।।५२।। गणेशाचिया सेवका वक्र पाही । असा या त्रिलोकाचिया आत नाही । यदीया सुकीर्ती श्रुता ही पुराणी । उपेक्षी न हा० ।।५३।। जयाने रमेशादिका सोडविले । जये स्वप्रतापे खळा मोडवीले । स्मरी ज्या सदा विष्णु-शंभू-भवानी । उपेक्षी न हा० ।।५४।। जयाचे पद स्पर्शिता चित्र नामा । सुगंधर्व तो उद्धरे सौख्यधामा । स्तवी नेतिनेतीति ज्या वेदवाणी । उपेक्षी न हा० ।।५५।। जयाच्या कृपे सर्जितो लोक धाता । जयाच्या कृपे विष्णुही विश्वपाता । जयाच्या कृपे संहरी शूलपाणी । उपेक्षी न हा० ।।५६।। पहा सूर्य चाले जयाच्या सुसत्ता । जगा मोहवी अम्बिका विश्वमाता । वधी रावणी यत्कृपे चापपाणी । उपेक्षी न हा० ।।५७।। मना मोरया सर्व चित्ती वसे रे । स्वदासावरी वाढवी प्रेम सारे । निजानंद आनंद कैवल्यखाणी । उपेक्षी न हा० ।।५८।। मना तुझिया बुद्धिला निश्चयो ना । उपेक्षा परी भालचन्द्री असे ना । स्वभक्तासि पावे मनी वेळ नाणी । उपेक्षी न हा० ।।५९।। जशी भावना मोरया त्याच रीती । तयाच्या मनी राहतो; सर्व भूती । अनन्या तसा रक्षितो पाशपाणी । उपेक्षी न हा० ।।६०।। जशी गाय ती हंबरे, वासराशी । त्वरे येऊनी दुग्ध पाजी तयाशी । तसा आळवी तूहि त्या प्रेमगानी । उपेक्षी न हा० ।।६१।। तुला हे मना एक माझी विनंती । गणशांकितत्वा धरी नित्य चित्ती । यदर्थी न कीजे कधीही अवज्ञा । मना तू करी विघ्नपी वास सूज्ञा ।।६२।। जया वेदशास्त्रे पुराणादि गाती । जया सेविती विष्णुशर्वादि चित्ती । समाधान त्याचेनि योगेचि अज्ञा ।

मना तू करी विघ्नपी वास सूज्ञा ।।६३।। मयूरेशनामे जगी धन्य व्हावे । क्रियोपासना-भक्तिते वाढवावे । असे सार औदासिनी वृत्ति बापा । सदा निर्मळा वृत्ति ती वारि तापा ।।६४।। नको वृत्तिमाजी स्पृहा वीषयाची । जियेने जडे कामना दुष्ट छी छी । स्वचित्ती निरिछे वसावा गणेश । नसावा तसा कल्पनेचाहि लेश ।।६५।। गणेशाविणे नेत्रि जो नान्य पाहे । खरे गाणपत्यत्व ते तोचि वाहे । जडे प्रीति पायी सुगाणेश्वरांच्या । खरा भक्त तो धन्य मोरेश्वराचा ।।६६।। झिजे ढुंढिकार्यी सदा यत्सुकाया । वदे वैखरी नित्य हेरंबराया । स्वधर्मोक्त कर्मी असे लोभ ज्याचा । खरा भक्त तो० ।।६७।। जसे बोलणे चालणे नित्य तेची । नसे विस्मृति ढुंढिच्या सेवनाची । मयूरेशपायी मना ओघ ज्याचा । खरा भक्त तो धन्य मोरेश्वराचा ।।६८।। नसे मानसी काम ना कोप भारी । नसे दंभही लोभ नाना विकारी । सदा शांत चित्ती न लेश भ्रमाचा । खरा भक्त तो धन्य मोरेश्वराचा ।।६९।। उदासीनता मानसी आदरीली । तशी ब्रह्मचर्यव्रती धी स्थिराली । मनी त्याग केला रजाचा तमाचा । खरा भक्त० ।।७०।। रसा माधुरी शांतिदा नम्र वाणी । कृता पूर्ण ते स्वार्थधी-धूळधाणी । प्रवेशू न होई मदा मत्सराचा । खरा भक्त० ।।७१।। उपाधी प्रपंचीक सांडूनि ठेला । निजानंदवादे क्रमी सर्व काला । कधी लिप्त झाली न वादे सुवाचा । खरा भक्त० ।।७२।। जरी बोलणे ते तरी सत्यवाद । न दंभादिकी जेथ हो लेश खेद । गिरा-वर्तने एकधा नित्य साचा । खरा भक्त०।।७३।। विवेकी सदा सत्यवाक् प्रेम पोटी । जनी आवडे आर्जवी सौख्य भेटी । सदा वाक् तपी निश्चयी जो मनाचा । खरा भक्त० ।।७४।। कदा कल्पनेचा न वाराहि साहे । अहो यौवनी जो वनी नित्य राहे । दृढा भक्तिधारी गणेशी सदाचा । खरा भक्त० ।।७५।। दुराशा

नसे मानसी लेश ज्याच्या । असे बद्ध जो प्रेमपाशेचि साचा । सुभक्तीबळे जो धनी विघ्नपाचा । खरा भक्त० ।।७६।। अति स्नेह दासी दयाळू मनस्वी । मनाचा मवाळू अती जो तपस्वी । करी अंत जो कोप संताप यांचा । खरा भक्त तो धन्य मोरेश्वराचा ।।७७।। गणेशानभेटी जरी तूज व्हावी । तरी कल्पना निर्विकल्पा करावी । जयाच्या मनी ढुंढि ना काम जेथे । नसे आदर प्रेम नाहीच बा ते ।।७८।। मना मोरया कामधुक् कल्पदारू । तुळे नाचि चिंतामणी रत्नसारू । जयाचेनि विष्ण्वादिका येई सत्ता । तयी साम्यतेचा करी कोण पत्ता ।।७९।। पहा जाऊनी कल्पवृक्षातळी हा । मनी दु:ख संकल्पिता तेचि दे हा । तसा सज्जनी वादही दु:खकारी । नको रे मना तू फसू या विचारी ।।८०।। निजध्यास सद्वस्तुचा तेथ नाही । तये प्राप्त हो शेवटी शोक पाही । म्हणूनी खुळ्या मानसा वाद सोडी । तरी तूज सद्वस्तुची होय जोडी ।।८१।। अती काम त्या ढुंढिचे प्रेम नाही । अती मूढ बा तन्मती हूड पाही । घडे क्षोभ तो लोभ जेथे स्थिरावे । अती विषयी दीनतेला वरावे ।।८२।। विना भक्तिपंथे जिणे व्यर्थ सारे । विमूढा सदा दु:खची साहणे रे । म्हणूनी धरी प्रीति हेरंबराजी । नको हे दुराशा धनी वामदा जी ।।८३।। असे घोर संसार नि:सार याचा । विवेकी मना बोध हा सज्जनांचा । अरे वीष खाता कुठे सौख्य आहे ? । म्हणूनी धरी ढुंढिचे ध्यान बा हे ।।८४।। मयूरेश हा पूर्ण लावण्यराशी । न लीला कळे लेश पद्मावराशी । सदा सेवकालागि जो साह्य व्हावा । मयूरेश हा सुप्रभाती स्मरावा ।।८५।। धरी जो मयूरेश पाशादि हाती । महाकालही पाहुनी ज्यासि भीती । सुरा राक्षसा मानवा कोण केवा । मयूरेश० ।।८६।। हरी जो भया दे निजानन्द भारी । भजावे

तया भक्तिभावे सुसारी । दुराचारही दंभ बोधे त्यजावा । मयूरेश० ।।८७।। वदा वासना टाकूनी ढुंढिनामा । तरी नाऽऽपदा या धरा नित्यनेमा । त्यजा दुर्मदा आळसा पाप हेवा । मयूरेश० ।।८८।। महादोष जाती जयाच्या सुनामे । घडे सद्गती पूर्ण होताति कामे । तशी सर्वसिद्धी मिळे मोक्षमेवा । मयूरेश० ।।८९।। गणेशान उच्चारिता नाहि कष्ट । न वेचे मुळी गाठिचा अर्थ शिष्ट । महापाप संसार-सिंधू तरावा । मयूरेश० ।।९०।। तनूदंडणी तो असे दु:ख फार । परी ढुंढि नामे फळे तेचि सार । रमाकांत शंभूहि चिन्ती सदैवा । मयूरेश० ।।९१।। पहा वाल्मिकी तारिला यत्प्रतापे । रघूनाथ तो चिंतितो नाम सोपे । विषापासुनी रक्षी जो वासुदेवा । मयूरेश० ।।९२।। पहा सूर्यही ढुंढिच्या कीर्तनात । रमे वंदनी शंभु तो गौरिकान्त । तसा अर्चनी केशवा मोद व्हावा । मयूरेश० ।।९३।। बहू साधनी पीडिती विघ्नमाला । व्रते दानसंघे वशे ती धनाला । म्हणूनीच हेरंब चित्ती वरावा । मयूरेश० ।।९४।। बहु साधनी एकटे साच सार । गणेशान हे नाम पाहे विचार । मना तू नको संशया देऊ ठावा । मयूरेश०।।९५।। मना होईना योग ना भोग काही । घडे कर्म ना धर्म ना शर्म पाही । तुवा ढुंढिनामी भरंसा धरावा । मयूरेश हा सुप्रभाती स्मरावा ।।९६।। सदा ढुंढिकामी अकामे झिजावे । निजानंदसिंधूमधे त्वा भिजावे । मयूरेश गाता घडे चित्तशांति । म्हणूनी धरी कीर्तनी प्रेम चित्ती ।।९७।। नसे यन्मनी लेश भक्ती गणेशी । तया पामरा सद्गती होय कैशी । गणाधीश जो नाथ विष्ण्वादिकांचा । तया चिंतिता देहसंसार कैचा ।।९८।। मना विष्णु-शर्वादिका पावनाते । गणेशा भजे ठेवुनी भावना ते । तरी या भवी नाहि बा भीति लेश । स्वरूपभ्रमे पावसी मात्र क्लेश ।।९९।। त्यजूनी वितंडा स्मरा

वक्रतुण्डा । तरी काळदंडा प्रचंडासि खंडा । मदादीक बंडासि घालूनि गंडा । करा तृष्णिकारूप भंडेसि रंडा ।।१००।। मना मत्सराच्या नको लागु नादी । स्मरे ढुंढिचे नाम बापा अनादी । सुशास्त्रात तन्नाम हे एक सार । असा रामनामादिकी नाधिकार ।।१०१।। जरी रामशर्वादि नामे जपावी । तरी देवता एकचि प्रीणिजाबी । गणेशाननामे हरीशादि सारे । पहा तुष्टती वेदशास्त्रे विचारे ।।१०२।। गणेशाननामी तुळे लेशमात्र । असे नाम नाही दुजे पुण्यपात्र । दुजी तूळणा ढुंढिनामी तगेना । अभाग्या नरा हे कधी ऊमगेना ।।१०३।। पुराणी पहा वाल्मिकीचे चरित्र । जपूनी जये रामनामा पवित्र । द्विजत्वघ्न पापासि जाळूनि शुद्ध । पहा रामनामेचि झाला प्रसिद्ध ।।१०४।। मुळीचाचि तो ब्राह्मणू कर्मयोगे । तया कोळि संज्ञा मिळे लागवेगे । दहा कोटि वर्षे अघे मुक्त झाला । द्विजत्वी कवित्वी प्रसिद्धीस आला ।।१०५।। गणेशाननामी विचारा महत्व । कळे पूर्ण तुम्हा तरी गूढ तत्व । पुराणी पहा मौद्गली श्रीगणेशी । महाविष्णु जे बोलिला पद्मजासी ।।१०६।। असे नाम नामा महा दुष्ट कोळी । महा पातकाचा महा पुंज मेळी । तये श्रीमुनी मुद्गलाच्या निदेशे । गणेशाननामी रती धारिलीसे ।।१०७।। महा मंत्र हा ढुंढिचा दुष्ट कोळी । जपे त्या क्षणापासुनी पापहोळी । सहस्राब्दमात्रे मुनीशान झाला । भ्रुशुंडी अशी होय आख्या तयाला ।।१०८।। धरेच्या तळी दूसरा हा गजास्य । पहा जाहला योगियांचा उपास्य । प्रती कल्पकल्पी रमेशादिकांचा । पहा ईश्वरांचा गुरु होई साचा ।।१०९।। मता मत्सरा त्यागुनी हे विचारा । गणेशाननामी महत्तत्व थारा । कुठे रामनामादि एतत्कलांशे । परी या जना हे कळेना मलांशे ।।११०।। महेश प्रभु प्राशिता काळकूट । स्मरे औषधा ढुंढिचे

नाम सार्थ । शिवेलागि सांगे महात्म्या अपार । म्हणे ढुंढि हे नाम सर्वत्र सार ।।१११।। रमाकांतही काळकूटे जळाला । तधीपासुनी तो धनश्याम झाला । महेशोपदेशे मयूरेशनाम । जपी विष्णु तेव्हाच पावे आराम ।।११२।। महालक्ष्मीला ढुंढिचे तत्व सांगे । निजश्रेष्ठता-ज्ञान सारूनि मागे । हरीशान ते ब्रह्मरूपे प्रसिद्ध । परी ढुंढिपायी अनन्यत्व शुद्ध ।।११३।। पहा राधिकानाथ गोलोकवासी । कलांशत्व जो ओपि विष्ण्वीश्वरांसी । धरी अंतरी ध्यान तोही गणेशी । मयूरेश हा मुक्ति देई जिवांसी ।।११४।। उमा शंकरू श्रीहरी कृष्ण राधा । तसा जानकीनाथही शुद्ध बोधा । धरी अंतरी ध्यान तोही गणेशी । मयूरेश हा मुक्ति देई जिवांसी ।।११५।। निजानन्दखाणी प्रभू मंगलेश । जयाच्या मुखी तो सदानन्द खास । नको व्यर्थ सन्देह तो घातकारी । निदिध्यास घे ढुंढिचा शोकहारी ।।११६।। जयाच्या मुखी ढुंढिचे नामध्येय । तये कामकोपादिकी भीति हेय । वसे धैर्य तन्मानसी ढुंढिभक्ति । धरी जिंकुनी काम तो सद्विरक्ति ।।११७।। किती मोरया नाम हे गोड साचे । परी येईना भाग्यहीनासि वाचे । भवा भंगुनी रंगवी आत्मरंगी । घडे मानवा मोद हेरंबसंगी ।।११८।। मुखी ग्रास घेता गणेश स्मरावा । महाघोर संसारसिंधू तरावा । मुखी नाम त्या भोजनी दोष नाही । उपाशीच तो बोलिला जेविलाही ।।११९।। नसे ज्याचिया आननी ढुंढिनाम । मना जाण तो सर्वथा पापधाम । सुवेदी पुराणी असे गीत थोर । गणेशान हे नाम सर्वस्वसार ।।१२०।। मना शहाण्या ऐक माझी विनंती । उगी या भवाची त्यजी सर्व खंती । गणेशी रती लेशही ना ढळो दे । तुझे धैर्य ते सज्जनांसी कळो दे ।।१२१।। करावा मुखे ढुंढिचा नामघोष । तरी सर्वथा सज्जना होय तोष । मयूरेशही होय अंकीत साचा ।

जरी आदरी ढुंढि हे नाम वाचा ।।१२२।। जगा रक्षितो श्रीहरी अन्नपाने । परी त्यासिही रक्षिजे धीधवाने । तयाचे जरी नाम घेशील वाणी । तरी होय तूझी वदे काय हानी ।।१२३।। हरिब्रह्मइन्द्रादिकांचाहि हन्ता । शिवेशान तो त्यागुनीही अहंता । जपी ढुंढिचे नाम तो गौरिसंगे । मना तू नको रे फसू लोभढंगे ।।१२४।। पहा नाम नामा अघांचा महोधी । मना श्रेष्ठता केवढी थोर साधी । भ्रुशुंडी महेशादिका ज्ञानदाता । असा थोर हो ढुंढिचे नाम गाता ।।१२५।। म्हणे अंत्यज शामनामा सुताते । 'अरे ये गणेशा' सकृद्वार त्याचे । मिषे नाम ते धाडि त्या दिव्य लोकी । गणेशाननामी गुरुत्वा विलोकी ।।१२६।। तसा पातकी नादकर्मा म्हणूनी । गणेशाननामावदे स्वैरगानी । दहा राक्षसा उद्धरी तत्प्रतापे । म्हणूनी मना गाई हे नाम सोपे ।।१२७।। पहा दैत्य वंशी महाभक्त झाला । सुबोधाख्य तो ढुंढिनामी निवाला । जरी तप्तिता त्या छळी थोर दंडे । परी सर्वदा रक्षिले वक्रतुंडे ।।१२८।।

महाभक्त बल्लाळ हो सिंधु देशी । दिवा रात्र तो मग्न झाला गणेशी । छळी तत्पिता नाम कल्याण पापी । परी रक्षित्या नाम पूर्ण प्रतापी ।।१२९।। मना ब्रह्मभूतत्व त्या ढुंढिनामाविणे ना मिळे विष्णुशर्वादि धामा । मतांचा अभिमान त्यागूनि सारा । मना सज्जना आदरी सद्विचारा ।।१३०।। जपी राम हेरंब या त्र्यक्षरांते । महत्वा जगी पावला बा परा ते । स्मृती-भक्त सीतापती विघ्नपाचा । पुराणी पहा बोलिली व्यासवाचा ।।१३१।। पहा भास्करू कीर्तनी मग्न झाला । गणेशाननामे क्रमी नित्य काला । अशा ढुंढिनामी विकल्पा धरूनी । अरे जाशि कैसा मना उद्धरूनी ।।१३२।। पहा काशिमाजी जना शूलपाणी । सुपात्रा वदे तारमंत्रार्थ कानी । तिथे शैवपंचाक्षरी मंत्र शैवा । तसा वैष्णवा राममंत्री

विसावा ।।१३३।। वदे शक्तिचा मंत्र शाक्ताही सौरा । रवीचाचि हे रीत सत्या विचारा । परी ब्रह्मभूताधिकारी जना तो । गणेशान-एकाक्षरी मंत्र देतो ।।१३४।। (इति गाणेशनाममहात्म्य प्रशस्त्युपदेश:)

मना तूचि रे 'सूक्ष्मतेने पहा हो' । जनी कर्मकर्त्या घडे काय लाहो । विधिप्राप्त योगे घडे एकही न । फुका होत देहा मना मात्र शीण ।।१३५।। दया जीवभूती खुळ्या ना धरीसी । अरे व्यर्थ आशा कशाची करीशी । गणेशान हेरंब हे पाश पाणी । फुकाची खुळ्या एवढी गाई वाणी ।।१३६।। यमे बोधिले मौद्गली किंकराते । गणेशानभक्ती न ज्या पामराते । छळा दूत हो त्या महा नर्कपूरी । खळा बूडवा ताप देऊनि भारी ।।१३७।। म्हणूनी मना ऐक आप्तोपदेशा । सदा सर्वदा आठवी रे गणेशा । तरी पापसिंधू चुके निश्चयाने । नको तू धरू लेश संदेह याने ।।१३८।। मना संतपायी सदा लीन व्हावे । तसे सर्वदा तन्मना तोषवावे । जरी तूजला देव हेरंब व्हावा । तरी द्रव्यदारात्मसंग त्यजावा ।।१३९।। गणेशप्रभूची कथा नित्य गावी । तनूमानसी एक वृत्ति धरावी । जयाच्या मनी कल्पना येति नाना । तया मोरया पावणे हेहि ना ना ।।१४०।। मना पोटि तू आदरी रे विवेका । क्रिया शुद्ध भक्ती धरी त्यागि शोका । क्रिया-वाणिचा भेद राहो नये हो । मना निर्विकल्पत्व जीवी धरी हो ।।१४१।। मना स्नानसंध्यार्चनी देवसेवा । करी एकचित्ते त्यजी लोभहेवा । कृपा साठवी सर्वभूती सदा तू । गणेशानभक्ती धरी नित्य हेतु ।।१४२।। मना काय गीतेत हेरंब बोले । सदा सज्जनी संग ठेवून चाले । कुसंगी नको तू भरू पापकारी । तरी साधती तूजला मुक्ति चारी ।।१४३।। जरी होय सत्संग रे भाग्यवंता । तरी दुर्गुणा सर्वथा तोचि हंता । हरी

आपदा सद्गुणी सोय लाहे । म्हणूनी धरी सत्पदा पूर्ण लाहे ।।१४४।। घडे भुक्ति ही मुक्ति सत्संगयोगे । तसे ब्रह्मभूतत्वही पायि लागे । क्रिया नीवळे भक्तिची वृद्धि होय । मना संतसंगे चुके रे अपाय ।।१४५।। अती वाद तो आसुरी संपदेत । प्रभू बोलिला आपुल्या सत्श्रुतीत । जिथे निर्विवादत्व तो वाद व्हावा । क्रियावाणिचा भेद बापा नसावा ।।१४६।। गुरुच्या वचा मान्यता द्यावयासी । शिरच्छेदवी ढुंढि हा गर्भवासी । दिगीशत्व शेषासि दे पाशपाणी । उपेक्षी न हा ढुंढि भक्ताभिमानी।।१४७।। पहा तो भरद्वाजजींचा कुमार । मयूरेश्वरी भक्ति साधी अपार । तया दे ग्रहत्वा सुभौमाभिधानी । उपेक्षी न हा० ।।१४८।। महादेव भस्माचिया संकटात । अतित्रस्त होऊनि त्या आठवीत । कसा धावला तेधवा सौख्यदानी । उपेक्षी न हा० ।।१४९।। जधी सिंदुरे पार्वतीला छळुनी । वनी दुष्ट घेऊनि जाई पळूनी । तदा रक्षिता तो जिला प्राणदानी । उपेक्षी न हा० ।।१५०।। पहा शंखशर्मा महा पापखाणी । परी एकदा आठवी ढुंढि वाणी । तया उद्धरी स्वामी हा कंजपाणी । उपेक्षी न हा० ।।१५१।। नृपा काशिपासाठि हा पक्षि होय । हरी मोरया काशिचेही अपाय । बहू पावले भक्त या अल्पदानी । उपेक्षी न हा० ।।१५२।। विधीसाठि हा ब्राह्मणत्वा वरूनी । श्रुती आणुनी देइ कैवल्यखाणी । मयूरेश या ख्यात झाला ऽ भिधानी । उपेक्षी न हा० ।।१५३।। सुरांता नरांता वधाया गणेश । धरी कश्यपाच्या गृही बालवेष । करी जो चरित्रे अपारे सुखानी । उपेक्षी न हा० ।।१५४।। मयूरेश झाला शिवेचा कुमार । जधी मातला दैत्य सिंधू अपार । रमेशादिका सोडवी बंदितूनी । उपेक्षी न हा० ।।१५५।। तसा सिंदुराचा कराया निपात । वरेण्याचिया मंदिरी होय सूत । सुरा मोदवी सिंदुराते वधूनी ।

उपेक्षी न हा० ।।१५६।। जधी दंभ झाला विधीचा कुमार । छळी त्यासि विश्वासिही तो अपार । वधी ब्रह्मपुत्राख्य धीसिद्धि जानी । उपेक्षी न हा० ।।१५७।। महादुष्ट तो ज्ञानहंता वधाया । प्रभू विष्णूगेही धरी बालकाया । सुबोधासि रक्षी पहा हे पुराणी । उपेक्षी न हा० ।।१५८।। महादुष्ट तामिस्त्र मारावयाला । गणेशान हा भानुचा पुत्र झाला । फणीचाही हा पुत्र हो ब्रह्मयोनी । उपेक्षी न हा० ।।१५९।। गणाख्यासुराचा करायासि घात । प्रभू कापिलत्वे जगी ख्यात होत । तसा विघ्नहा पार्श्वपुत्राभिधानी । उपेक्षी न हा० ।।१६०।। गजाख्यासुरे पीडिले विष्णुशर्वा । प्रसन्न प्रभूला त्यजूनी स्वगर्वा । रिघालेचि पाराशरा बद्धपाणी । उपेक्षी न हा० ।।१६१।। कलीच्या सदंती प्रभू धूम्रवर्ण । धरी वेष कल्कि जधी वीर्यहीन । अति भक्तिचा लोभि हा वेदपाणी । उपेक्षी न हा० ।।१६२।। स्वभक्तास्तवे वेष–लीला करीत । जना भाविका मोरया उद्धरीत । परी कोणी नेणे अशा तन्महाला । तरी प्राणि हा व्यर्थ जन्मूनि मेला ।।१६३।। जयाचे मुखी येई विघ्नेशनाम । जगी धन्य तो गाणपा सौख्यधाम । मुखी सर्वदा गाणपी कीर्ति गावी । विवेके अहंता दुराशा त्यजावी ।।१६४।। क्षमा शांतता मानसी आदरावी । सुखाने कथा मोरयाची करावी । सदा काय–वाङ्मानसी ऐक्य व्हावे । मयूरेश्वरा स्वात्म बोधे भजावे ।।१६५।। निवांत स्थळी बैसुनी एकचित्ते । भजावा गणेश स्ववाक्कायचित्ते । स्वसंवेद्यता तै अपैसी वळेल । प्रभूच्या कृपे चित्तही नीवळेल ।।१६६।। जगी हा जगद्रूप ढुंढि पहावा । तदीया सदा सर्वदा मान द्यावा । करावे सदा मानसी पूजनाते । धरावे गणेशी सदा सख्य नाते ।।१६७।। मना शास्त्रमार्गी अनंतत्व आहे । त्यजी ऐकटे प्रेम चित्तात वाहे । अती भक्तिचा मोरया हा भुकेला । गणेशानभक्ता

भवू हा चुकेला ॥१६८॥ मना वृत्ति जे व्यावहारिक दक्ष । तिला क्षिप्त हे नाम दे योग दक्ष । त्यजूनी तिला ओळखी चालकाते । तरी ब्रह्मभूतत्व येईल तूते ॥१६९॥ दुजी वृत्ति ते मूढ मूढत्व बोधी । त्यजीही तिला चालका मात्र शोधी । जरी गूढ तूझे कळे तूज ना ते । तरी ब्रह्म० ॥१७०॥ तिजी वृत्ति विक्षिप्त ते साधकाची । असे माउली कास सेवी तियेची । तिला सेविता मार्ग बोधील ते ते । तरी ब्रह्म० ॥१७१॥ जगी एकता दृष्टिची होय जेंव्हा । तिला येई एकाग्रता नाम तेंव्हा । मना आठवी सावकाशे तियेते । तरी ब्रह्म० ॥१७२॥ तिला योगमार्गेहि उल्लंघिताच । निरुद्धत्व ते तूज भासेल साच । तिने आत्मरुपा स्वकीया पहा ते । तरी ब्रह्म० ॥१७३॥ अशा पंचधा वृत्तिचा त्याग होता । गणेशान योग्यांचिया येई हाता । भवप्रत्ययी शांतिभोगासि घेता । समाधान होई कळे नान्यचेता ॥१७४॥ भवप्रत्ययो पंचधा बोलियेला । असत्-सत्-समाऽव्यक्त-नैजत्व ज्याला । तयाते निजानंद ऐसे म्हणावे । स्वलोकाभिधाने प्रभू ज्या खुणावे ॥१७५॥ तदीयान्त होता अयोगान्त योगी । निरानन्दता आपुली मूळ भोगी । उपायाख्य या प्रत्यया नाम देती । मना ओळखी ठेवि रे सांगतो ती ॥१७६॥ भवोपायता जेथ होते निवृत्त । तया पूर्णयोगेश हे नाम दत्त । खरा ब्राह्मणस्पत्य ते शांति भोगी । मना त्याविणे सर्व संसार रोगी ॥१७७॥ मना आपुल्या तू तनूचा विचार । कधी रे करीसी, खरे दुर्निवार । पहा स्थूल सूक्ष्मा समा नाद देहा । त्यजूनीच खोटा मना नाद दे हा ॥१७८॥ अरे देह माझा म्हणे कोण सांग । खुळ्या नेणसी देही तो जाण चांग । तदीया सुबोधासी बोधत्व नाम । विदेहात्मता देह देह्या विराम ॥१७९॥ विदेहादिकांचा घडे योग जेथे । निजानन्दता बाणते जाण

तेथे । असा तत्त्वबोधी निजाभ्यास व्हावा । तरी शांतियोगी पुरा भोग घ्यावा ।।१८०।। अयोगादिकाही मिळे शांति जेथे । मनोवाणिता काय राहील तेथे । स्वसंवेद्य ते जाणता मात्र जाणे । अयोगी तसेही सदा दीनवाणे ।।१८१।।

अरे पंचवृत्त्यात्मिका तीच सिद्धी । धरी जी तदाकारता तीच बुद्धी । तयांचा परात्मा गणाधीश भर्ता । असे विष्णुशर्वादिका तोच कर्ता ।।१८२।। तया जाणणे सद्गुरुवीण नाही । जनी खूण बांधूनि ठेवी मना ही । सुशांतिप्रदाता गुरु तो अलभ्य । असे सर्वदा बोलती संत सभ्य ।।१८३।। श्रुतीशास्त्रि जे बोधिले कर्मतत्व । तया आचरी अंतरी पूर्णसत्व । विरुद्धाऽपवित्रेहि पाखंड-कूटे । जनी तोडिता सद्गुरु-स्वल्प भेटे ।।१८४।। स्ववर्णाश्रमाचार नेटेचि चाले । वरी भक्तिवैराग्यही पूर्ण आले । असे ब्रह्मविद्या खरी स्वानुभूत । असे सद्गुरु दुर्लभू रत्नभूत ।।१८५।। निजानन्दसंमग्नता पूर्ण जेथे । दुराशापिशाचे कशी येति तेथे । न टोपी टिळा माळही मिरवीत । असे सद्गुरु० ।।१८६।। नसे मायिकत्वादि कापट्य काही । तसा मानसी लोभ वा दंभ नाही । नसे कोप वा काम नाहीच तेथ । असे सद्गुरु० ।।१८७।। स्वये मानसी तर्कटी ही कुशंकी । बळे नेणत्याचे सदा कान फुंकी । जसे आवडे शिष्यचित्ता तसेच । तया बोधि वा दुर्गुरु हे असेच ।।१८८।। बळे सोडवी श्रौतही स्मार्त कर्म । म्हणे एकटे नाम घ्या हाचि धर्म । बहू तंत्रमंत्री जिथे होय नाच । मना दुर्गुरु ओळखी हे असेच ।।१८९।। नसे जेथ शिष्यादिकी लेश भीड । जिथे स्पर्शली नाहि ते लोभकीड । करी श्रौतही स्मार्त कर्मोपदेश । मना सज्जना सद्गुरु तो विशेष ।।१९०।। श्रुतीशास्त्रसंधी विरुद्धत्व नाही । अशी दावि जो भक्ति तो संत

पाही । अती उज्वलू चालवी सम्प्रदाय । जया सेविता लेश नाही अपाय ।।१९१।। जयाचा जरी लेशही संग होय । तरी हो भवप्रीति शैथिल्यसोय । श्रुतिस्मार्तकर्मी जडे प्रीति पूर्ण । वळे सत्कृतीच्या पथी लक्ष्य तूर्ण ।।१९२।। अभक्ता मिळे सोज्वळा भक्ति जेथे । सुभक्तासि वैराग्य होणार तेथे । विरागी निजानन्दसौख्यासी भोगी । जगी धन्य तो सद्गुरु राजयोगी ।।१९३।। अशा सद्गुरुच्या पदी लीन होता । न लागे तुला बा भवाब्धीत गोता । म्हणूनी मना ऐक रे हीत तुझे । त्यजी संतसंगेचि संसार-ओझे ।।१९४।। मना या जनी वादवाटा कितीक । परी एकही पावला नाही सूख । किती न्यायसांख्यी बुडुनीच मेले । विचारे पुन्हा शेवटी रोगिजेले ।।१९५।। पहा शैव हे मांडती शंभू थोर । म्हणै वैष्णवू एकटा विष्णु थोर । म्हणे शाक्त की शक्ति हे श्रेष्ठ सर्वी । तसे सौरही बोलती सूर्य गर्वी ।।१९६।। उमेच्या सुताते किती पूजिताती । किती मारुती मल्लहन्ता पहाती । कुणी बोलती दत्त गोपाल थोर । प्रतिस्पर्धि त्याते म्हणे कृष्ण चोर ।।१९७।। कुणी भैरवातेचि मान्यत्व देती । कुणी चण्डिका भूतखेते पहाती । कुणी मानिती श्रेष्ठ सीतापतीते । नृसिंहत्व माने कुणाच्या मतीते ।।१९८।। जयाच्या मते वाटले तेचि थोर । परी पाहती कोणि ना सद्विचार । मना योग वेदांत जेंव्हा पहासी । तधी शांत होऊनी चित्ती रहासी ।।१९९।। अरे हा विधी सर्जितो या जगासि । परी सर्जितो सांग रे कोण त्यासी । जगालागि नारायणे पाळिजावे । परी रक्षिता कोण त्याचा पहावे ।।२००।। अरे शेवटी संहरी शंभु सारे । परी शंभुहन्ता असे तो कसा रे । जगी मोहवी शक्ति हे सर्व जाणे । परीशक्तिचा मोहकू कोणि नेणे ।।२०१।।

प्रकाशे रवी विश्व हे भासवीतो । परी भासवी कोण बा भास्करा तो । असा काहि चित्ती करावा विचार । त्यजावा मतांचा सुखे गर्वभार ।।२०२।। अरे विष्णुशंभू-रविब्रह्मदेव । महेन्द्रादि जे बोलिले संघदेव । जिला गूणमाया असे बोलतात । तियेपासुनी सर्वही विश्वजात ।।२०३।। गुणांचा महेशान तो निर्गुणात्मा । असे जाण ॐकाररूपी परात्मा । सुविद्या अविद्या जया दोन जाया । भवोल्लंघनी साधने बा भजाया ।।२०४।। जया वेद चिन्तामणित्वेचि वानी । परा ब्राह्मणस्पत्यता तेथ मानी । तया भक्तिपंथे सदा आळवावे । अविद्या-जला साधने वाळवावे ।।२०५।। मना सज्जनांची धरूनीच कास । स्ववृत्ति सदा आदरूनी उदास । मनी चिंतिता रूप ॐकारमात्र । कशी भासते सांग अज्ञान-रात्र ।।२०६।। बळे वृत्तिचा रोध बापा करावा । निजध्यास रात्रंदिनी तो धरावा । मनोवाणिची कर्तरी ते करोनी । अविद्या-पटा टाकिजे कर्तरूनी ।।२०७।। घडे वृत्तिचा रोध ज्या काळि बापा । उरी लेश ना राहि संसारतापा । निजानन्दता ते न ये बोलता रे । जळी होतसे मत्स्य कैलोळता रे ।।२०८।। मनोवाणीयुक्तत्व ते जेथ नाही । मनोवाणि हीनत्व नाहीच पाही । अनिर्वाच्य ते वाच्य होईल कैसे । जिभेवीण माधुर्य न ज्ञात जैसे ।।२०९।। मना वृत्तिरोधासि बापा करूनी । सकृत् ढुंढिनामा असे तू स्मरूनी । तरी तूजला ब्रह्मभूतत्व येई । द्विवारे ऋणी ढुंढि हो; वेद गाई ।।२१०।। मनोवाणियुक्तत्व तो हा गकार । मनोवाग्विहीना स्वधी तो णकार । तयाहूनि जे पूर्ण की निर्विशेष । मना नाम ते जाण बा श्रीगणेश ।।२११।। ग ह्या व्यंजने शक्तिचा बोध होतो । अ कारस्वरे ओळखी भानु जो तो । ण कारीच नारायणे वास केला ।

अ कारस्वरे ओळखावे शिवाला ।।२१२।। चतुर्ब्रह्मता जेथ एकत्र होई । गणाख्या तया वेद हा साम गाई । तदीशत्व जेथे वसे निश्चयाने । गणेशत्व ते जाणवे योगमाने ।।२१३।। म्हणूनी मना तूजला वारवार । असे सांगणे की करी सद्विचार । क्षणे-शिक्षणी आठवी रे गणेश । तरी पावशी पूर्णता निर्विशेष ।।२१४।। मना हे सुशिष्या कळे आपआप । जया सद्गुरु सेवने नष्ट पाप । मनी सद्गुरुचे करी ध्यान नित्य । तया ज्ञान हे प्राप्त होईल सत्य ।।२१५।। सुशिष्यत्वही फार बापा कठीण । गुरुचाहि जो वारितो सर्व शीण । कृतीने जया ऐक्य हो सद्गुरुचे । कुणा शक्य बा भाग्य वर्णू तयाचे ।।२१६।। बहू कर्मही ज्ञानही बोलियेले । परी शेवटी सार्थकू हेचि झाले । गुरुची कृपा पूर्ण ज्या साध्य झाली । भवाद्रीस तो चेंडुसा शिष्य झेली ।।२१७।। असो मानसा स्वस्वभावा वरूनी । तुवा ऐकली आमुची बोधवाणी । परानन्द झाला मुखे बोलवेना । तुझ्या या गुरुत्वा अम्हां तोलवेना ।।२१८।। पुन्हा शेवटी सांगणे हेचि आहे । गणेशा भजावे सवाक् चित्तदेहे । गणेशेति वर्णत्रयी लीन होई । मना सज्जना एवढे दान देई ।।२१९।। गणेशान हेरंब हे पाशपाणे । मयूरेश जो मारिला सिंधु जेणे । असे सर्वदा गाइ मन्मानसा तू । दुजा काहि नाही बरे आत्महेतू ।।२२०।। करी ढुंढिच्या सद्गुणांचेचि गान । धरी अन्तरी मोरयाचेचि ध्यान । निजध्यास होता तुला होइ अन्ती । स्वसाक्षात्कृती सर्वथा सोडि खंती ।।२२१।। मनोबोध हा ऐकता पापनाश । सदाचार हो तोडि संसारपाश । करी पूर्ण ये ब्रह्मभूतत्व भारी । म्हणे सज्जना दास अंकूशधारी ।।२२२।।

(फलश्रुती)

मनोबोध हा ऐकता पापनाश । सदाचार हो तोडि संसारपाश । करी पूर्ण ये ब्रह्मभूतत्व भारी । म्हणे सज्जना दास अंकूशधारी ।।२२२।।

इति श्रीमद्गणेशचरणाब्जषट्पद-श्रीजामदग्न्यगोत्राद्भूत-टिकेकरावटंकित नारायणगडनिवासी श्रीभगवंततनूजनित, श्रीमद्गुरुवरदत्त-श्रीमदंकुशधारीत्यपरनामक - श्रीगजाननमहाशयविरचितं, ''श्रीमद्-गाणेशीमनोबोध-श्लोकसमूहाख्यं'' महाराष्ट्रभाषाकाव्यं संपूर्णम् ।। श्रीमद् अखिल-गाणेशोभ्यो महद्भ्यो नमः ।। श्रीमद-गणेश-योगीन्द्राचार्यवययि नमः ।।

***

## श्रीगणेशमंत्राचे श्लोक

### प्राकृत - (बोधपर) वृत्त 'भुजंगप्रयात'

**।। श्रीगणेशाय नमः ।। श्रीसिद्धिबुद्धिभ्यां नमः ।।**
**।। श्रीगुरवे नमः ।।**

नको वेदशास्त्रांतरी वाद मोठा । तथा शीकता येतसे गर्व ताठा । जना गर्व हा दावितो नर्क दारे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।१।। नका ह्या प्रपंची शिरू पापरूपी । इथे काळ हा तस्करू कंठ कापी । तुम्हाला न कोणी तिथे सोडवी रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।२।। तुला व्यर्थ हा मोह बा कामिनीचा । परी

नागिणी हे असे सत्य वाचा । तुझ्या पाश घालील बापा गळा रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।३।। तुला वाटती पुत्र हे आप्त मोठे । परी सर्वथा मानसी जाण खोटे । कुणी स्नेहसा शेवटी दाविती रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।४।। नको तीर्थ-यात्रा करू काहि बापा । यथाशास्त्र होता न तू पात्र पापा । उठाठेव ही व्यर्थ बा कासया रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।५।। व्रते बोलली शास्त्रसंघात नाना । परी एकही शास्त्रमार्गे घडेना । उगा मात्र ही वाढते चावटी रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।६।। बहू मंत्रशास्त्रांतरी बोलियेले । बहू साधकू साधुनी त्यासि मेले । परी तत्त्व ते काहि येना करा रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।७।। बहू बोलिली वेदशास्त्रे पुराणे । असंख्यात गाथा किती कोण जाणे । परी सर्वथा सार हे बोलिले रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।८।। नको आसने योग अष्टांग नाना । तया साधिता होतेसे फार दैना । क्वचित्पावती पार गोते बहू रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।९।। बहू कर्म ते बोलिले शास्त्रवेदी । तया पाहता चित्त हो मग्न खेदी । म्हणूनी तुम्हा हेच मी सांगतो रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।१०।। विभूतीज ते व्यर्थ रे लांब पट्टे । तुला लाविती धर्मिचे मात्र चट्टे । तयाने हिता कायसे साधणे रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।११।। तुला वाटते मान व्हावा जनात । परी मान्यता ते असे वा धनात । म्हणूनी नको मान्यतेला शिवू रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।१२।। तुला लोक जे दाविती प्रेम थोर । खरे ते नसे सांगतो त्या समोर । असे सत्यवाक् साधु तो एकला रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।१३।। तुझ्यासाठी जे जीव की प्राण देती । पहा निर्दयी शेवटी तेचि होती । तुला जाळिती घालुनी सर्पणी रे । नमः

श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।१४।। इथे नित्य जी जोडिशी पापराशी । तुला शेवटी तीच दे खापराशी । तुम्हा हीत मी तुमचे सांगतो रे । नम: श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।१५।। तुला यातना घोर होईल जेंव्हा । नसे सोडवाया कुणी शक्त तेंव्हा । म्हणूनी आम्हा वाटते काळजी रे । नम: श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।१६।। यमाचे तुला दूत ओढूनि नेती । बहू हाणिती मारिती ठोकिताति । तुझी दुर्दशा काय ती मी वदू रे । नम: श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।१७।। महाक्रूर ते सोयरे भास्करीचे । नव्हे रे नव्हे कार्य ते मस्करीचे । पडे खडगधारेवरी चालणे रे । नम: श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।१८।। तुला पालथे पाडुनी काळदूत । बळे त्वन्मुखी घालिती गूथ मूत । असेही करूनी हसू लाविती रे । नम: श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।१९।। तुझ्या ठोकिती ते अपानात मेखा । तदा वेदनांचा करी कोण लेखा । तुझे शिश्न ते कापुनी खा म्हणे रे । नम: श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।२०।। तुला ओणवे काळदूती करूनी । शिखा बांधिती आंगुठ्याते धरूनी । कळा लागता सर्वही हासती रे । नम: श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।२१।। तुझे पोट ते फाडती तीक्ष्ण शस्त्रे । तुला खाववीती तुझी देह-अंत्रे । तुझी जीभ ते ओढुनी फाडती रे । नम: श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।२२।। अशा यातना काय सांगू किती रे । तुला काळ देई नसे त्या मिती रे । मला बोलता हे भरे कापरे रे । नम: श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।२३।। मुले बायको आपुले भाऊबंद । पिता माऊली जाण हा सर्वबंध । तुला मोह पंथात हा घालवी रे । नम: श्रीगणेशाय मंत्र जपा रे ।।२४।। निज-स्त्री मुले यांसि पोसावयासि । किती कष्ट तु बापुड्या बा वहासी । सुखाचा तरी लेश ना तूजला रे । नम: श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।२५।। अरे

ही तनू फार पुण्ये मिळाली । परी व्यर्थ तु घालवीसी कुमेळी । नको रे नको हे असे तू करू रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।२६।। अधोमूख विष्ठादिकी गर्भवासी । तुला भोगणे बा पडे अंक मासी । किती यातना गर्भजा आठवी रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।२७।। महादुःख ते गर्भिचे होय जेंव्हा । मयूरेश्वरा बाहसी फार तेंव्हा । 'अगा सोडवी मोरया येथुनी रे' । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।२८।। तनु ब्रह्म तै आठवे तूज सोऽहम् । पुढे विस्मृती बोलसी शब्द कोऽहम् । अरे हा भवू घातकी घातकी रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।२९।। पुढे ये तुला बाल्य तै ज्ञानशून्य । नये बोलता चालता शुद्धमौन्य । तनू ते तुझी कापती पोळती रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।३०।। तुला जो पुढे येई पौगंडता ती । तदा दीस खेळामध्ये सर्व जाती । कुठे अल्पशी अक्षरे शीकता रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।३१।। जवानी पुढे पातली आयतीच । तुला सेवणे आवडे काय नीच । सदा चिंतसी मानसी कामिनी रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।३२।। जरी दृष्टीच्या आड ती होय कांता । तरी पावसी मानसी तू अकांता । भली वेड लावी तुला भामिनी रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।३३।। तुझे कान गेले दिठी मंद झाली । तुझ्या शक्तिही इंद्रियाची बुझाली । न ते बोलणे शुद्ध ये बोबडे रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।३४।। जरी जर्जरा जाहली पूर्ण काया । तरी सोडसी ना खरा तूर्ण माया । खरी साठिची नाठि होई मती रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।३५।। गळा खूप दाटेल जेंव्हा कफाने । दुजे पित्तही वात होई हटाने । अवस्था तुझी घोर होईल बा रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।३६।। असे तूज होणार होते पहासी । तुझ्या बाप आजासि त्वा देखिलेसी । करी

कंकणा कायसा आरसा रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।३७।। अकस्मात तूते यमाच्या पुरीत । पहा ओढुनी नेतिरे काळ दूत । म्हणून मयूरेश्वरा आठवा रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।३८।। नका शास्त्र-वादान्तरी हात घालू । नका रे कुपंथे कदा काळि चालू । तुम्हा सांगतो मार्ग सोपा धरारे । नम श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।३९।। तनूला बहू पुष्ट केली जरी ही । तरी रोग भोगादि होईल पाही । किती भोगणे प्राप्त बा आपदा रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।४०।। त्यजी रे दुराशा धनाद्यर्जनाची । नको भीड ठेवू उगी या जनाची । परस्त्री-धनी द्रुष्टि देऊ नको रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।४१।। जगी जेतुला मानवा व्याप केला । तरी तेतुला जाण संताप झाला । असे मूळ संताप तो पातकी रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।४२।। कितीही जरी अर्जिशी कंठशोष । न ये नष्ट आयुष्य वा नष्ट कोश । मला नाकळे काय तो फायदा रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।४३।। बहू शास्त्र शास्त्रार्थ ते सांगसी रे । तुला त्वद्गती ना कळे ती कशी रे । फुके नाम ते आननी का नये रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।४४।। अरे वीष हे वीषयू सत्य मानी । तया सेविता शेवटी होय हानी । नको मानदंभादिकी तू रुतू रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।४५।। अरे कोरडे भस्म लावूनि काय । जटा राखुनी साधु होईल हाय । अरे सर्वही कोरडे कोरडे रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।४६।। नको मंत्रदीक्षा नको तंत्रभिक्षा । नको साधने षट्क्रियांची अपेक्षा । नको कृच्छ्र चांद्रायणे चातुरी रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।४७।। नको फार विद्या कळा नेमनिष्ठा । तनू दंडणे देई रे देहकष्टा । वृथा ग्रस्त आयुष्य होईल बा रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।४८।। अरे या जगी यत्तुलेला

न मान । असे धर्म–रामादि जे धन्य–मान । तयाही करी काळ हा गट्ट बा रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।४९।। बहु कल्प कल्पायुही नष्ट झाले । तप:साधनी कष्टले तेहि मेले । दुजी सुष्टी केली; निशाणी नुरे रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।५०।। सदा मग्न तू होसि बा रोजगारी । जगी नावरूपादिकी हाव भारी । निघे स्वारि अश्वी वरी पालखी रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।५१।। असा गाव माझा तशी देश भूमी । घरे लोड मेणें तनूच्या अरामी । तुला लोळण्या उंच गादी मऊ रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।५२।। कसे कौरवादी बली रावणादी । जगी जाहले मस्त लक्ष्म्यादि नादी । परी आज त्यातील काही नुरे रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।५३।। अरे ज्या स्थळी नित्य दुर्गंधि वाहे । जया बोलता सांगता लाज आहे । तिथूनी तुझा जन्म धिक् जाहला रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।५४।। अरे ज्या तुला पाळुनी पोसुनिया । तुझी एवढी वाढविली सुकाया । तया मायबापा कसा वोखटा रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।५५।। तुझी मुंजही कष्ट सेवूनि केली । तुला बायको छान रे मेळविली । अरे धिक् खळा त्या कसा निंदिसी रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।५६।। अरे विस्मृती जाहली हे कशी रे । कसा वेगळा त्याहूनी नीघशी रे । नको तू पडू कामिनीच्या फशी रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।५७।। अरे या जगी आयु संख्या शता रे । उरे जे त्र्यवस्था तयी त्यागिता रे । तिथे शोक दु:खे सदा काळजी रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।५८।। मनामागुती धावती सैरवैरा । स्वधर्मादिका त्यागिसी पूर्ण स्वैरा । कुटुंबीच तू पोटपोशा खरा रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।५९।। तुझा एक छंदा दिसे बुद्धिमंदा । सदा पोटधंदा

पराव्यादि – निंदा । स्तवे आर्जवे द्रव्य ते जोडिशी रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।६०।। कळेना पुढे काय होणार तूते । धने वाढलीसे मदोन्मत्ता ते । अरे गर्व मोहादि ही वीचिंदारे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।६१।। करी आरसा घेऊनी तू पहासी । तनू नेटकी भूषणी भूषवीसी । मिशा पीळसी अंति अग्नी गिळी रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।६२।। कितीही जरी द्रव्य ते मेळवीले । तरी लेशही चित्त नाहीच धाले । दुराशा कशाला पुढे ठेविशी रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।६३।। अरे वृद्ध होशी तुझी शक्ति जाई । तयी पुत्र पौत्र प्रिया कोणि नाही । तुझ्या अंतकाळी धना धुंडिती रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।६४।। किती मूर्ख तू मानवा बा खटचाळ । सदा ऐकसी वाजते हे घड्याळ । तुला ते म्हणे तास गेला वृथा रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।६५।। भुईला कसा गाढवा भार होसी । जयी जन्मला त्या कुळा लाजवीसी । तुला जन्मुनी वांझ हो माउली रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।६६।। तुझी हे जवानी खरी रे दिवाणी । तुझे चित्त हे लेश राहे न मानी । तया तो बहू चोरटे भेटती रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।६७।। कळेना कशी कोणती वेळ येई । कळेना कधी काळ ओढून नेई । बळेच्या बळे मृत्युपंथे गते रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।६८।। अनिर्वाच्य त्या यातना कल्प कोटी । तुला भोगिता लाज येई न मोठी । पुन्हा जन्ममृत्यूचिया संकटी रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।६९।। नको ती अहंता तया घातकारी । नको सोंगढोंगे नको छंद भारी । नको शिष्य शाखा मठादि भुयारे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।७०।। अरे व्यर्थ हा काल जातो अमोल । विचारी जनी चाउटी सर्व फोल । सदा ध्यान लावी मना ढुंढिचे

रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।७१।। भवारण्य हे फार रे फार घोर । इथे बैसले कामकोपादि चोर । धरूनी सुसंगा तया आक्रमी रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।७२।। अरे संतसंगे कळे भक्ती मुक्ती । कळे ज्ञान संसार खोटा, विरक्ती । म्हणूनी तयांच्या पदी लीन व्हा रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।७३।। असत्संग तोडा, सुसंगासि जोडा । तरी हीत होई तुटे गर्भखोडा । मनी दुःख साद्यंत ते आठवा रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।७४।। नको व्यर्थ या मारू संसार गप्पा । मनी आठवा काळ मारील धप्पा । म्हणूनि तुह्या सांगतो जाग घ्या रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।७५।। तुझे सर्वही कर्म हा सूर्य पाहे । तसे भूमी आकाशही पाच बा हे । पुढे नर्क हा गर्क देई बहू रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।७६।। जरी बोध हा मानसी वागवाल । तरी निश्चये सौख्यभागी च व्हाल । नसे ऐकणे हे तरी आरडा रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।७७।। बहु बोलिली साधने देति कष्ट । असे एक एकाहुनी फार खाष्ट । म्हणूनी म्हणे एवढे आयका रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।७८।। नमः श्रीगणेशाय मंत्राविहीन । दुजी सर्वही साधने जाण हीन । गजास्ये तुम्हा तेचि ते बोलिले रे । नमः श्रीगणेशाय मंत्रा जपा रे ।।७९।।

**। इति श्रीगणेशमंत्राचे श्लोक संपूर्ण ।**

***

## अथ श्रीनग्नभैरवराज स्तोत्र

श्रीगणेशाय नमः श्रीनग्नभैरवराजाय नमः । (श्लोकअनु.)
श्रीनग्नभैरवा देवा, नमस्कार असो तुला ।
कृपा करूनि रक्षावा, दयाळा दास आपुला ।।१।।

प्रचंड भीमरूपा हे भैरवा परमेश्वरा ।
सुटतो ऐकुनी कंप, त्वद्रवा करमेश्वरां ।।२।।

वज्रदेहा कृपासिंधो, अधर्मिष्ठां भयप्रदा ।
धर्मिष्ठा रक्षिसीं प्रेमें वारुनी सर्व आपदा ।।३।।

गाणेशांचा प्राणसखा, एकला तूंचि बा खरा ।
रक्षिसी पुढतीं मागें, मायसा स्वीय लेकरां ।।४।।

श्रीभूस्वानंद सत्क्षेत्रीं, मुख्याधिष्ठान शोभलें ।
परंतु गाणपत्यार्थ चित्त सर्वत्र लोभलें ।।५।।

सप्रेमें नाचसी देवा । गणेशानाग्रि जेधवां ।
देहभान न तें राहे, मोद हा वाढतो नवा ।।६।।

अट्टाहासरवें देवां, दानवा कांपरे भरे ।
नग्नभैरव हे कानीं, ऐकतां धृति ना उरे ।।७।।

सर्वमायाविहीना हे, सर्वमाया-प्रचालका ।
सर्वांतर्यामिगा देवा, रक्षिं या दीनबालका ।।८।।

भुक्तिमुक्तिप्रदा स्वामिन् धनधान्यविवर्धना ।
योगींद्रपाला नमितों पाव रे दुष्टमर्दना ।।९।।

त्वद्भीतीने विश्व सारें भयभीतचि वर्ततें ।
त्वत्पादनिष्ठ गणती भवसिंधूसि गर्त ते ।।१०।।

कृपाळा भैरवा पाव, नाव आम्हांसि या भवीं ।
तुझी कृपा एक मात्र, आम्हां दीनां सदा हवी ।।११।।

स्तविती स्तोत्रराजें या, जे तुला करुणाघना ।
तयातें लेश ना होती भैरवेश्वर-यातना ।।१२।।

अनुष्टुप् वृत्तिं पहिलें रत्न श्रीनग्नभैरवा ।
अर्पि अंकुशधारी हा, करुनी करुणा-रवा ।।१३।।

**।। जय जय गणराज समर्थ ।।**

**।। इति श्रीनग्नभैरवराजार्पणमस्तु ।। श्रीस्वानंदेशार्पणमस्तु ।।**

# श्रीमद्‌गणेशयोगीन्द्राचार्याष्टक–स्तोत्रम्

## श्लोक–संस्कृत (इंद्रवज्रा)

### श्रीढुंढिराज उवाच –

अद्राक्षमक्षीण–दयानिधानमाचार्यमाद्यं गणनाथपार्श्वे ।।
योगेन देहोत्थित–दिव्यवातै–र्नेत्रादिहीनं सुगुणं चकार ।।१।।

अपार कारुण्यसुधातरङ्गै–रपाङ्गपातैरवलोकयन्तम् ।।
कठोर – संसार निदाघ तप्तान्–मदादिकान्नौमि गुरुं गुरुणाम् ।।२।।

स्वदक्षजानुस्थित–वामपादं–पादोदरालं कृतयोगपट्टम् ।।
आलोकये देशिकमप्रयेयमनाद्यविद्यातिमिर–प्रभातम् ।।३।।

उपासते यं द्विजवर्यमुख्या–निराशिषो निर्ममताधिवासाः ।।
तं योगिनं मुद्‌गलरूपमाद्यमुपास्महे मोहमहार्तिशान्त्ये ।।४।।

विद्राविताशेषतमोगणेन–मुद्राविशेषेण मुहुर्निजानाम् ।।
निरस्य मायां दयया विधत्ते–गुरुर्महान् तत्त्वमसीति बोधम् ।।५।।

ममाद्य योगी गणनाथभक्तः–कृपा–विशेषात् कृतसंनिधानः ।।
एकार्णरूपामुपदिश्य विद्यामाविद्यकध्वांतमपाकरोतु ।।६।।

चारुस्मितं मुद्‌गलरूपमाद्यं–संन्यासिनं शान्तिपदाधिरूढम् ।।
उपासते गाणपयोगिनस्तमुपात्तनादानुभवप्रमोदम् ।।७।।

(आर्या.) गणपतिनिकटनिवासं पटुतरविज्ञानमुद्रितकराब्जम् ।।
कंचनदेशिकमाद्यं वन्दे गणेशयोगीन्द्र–संज्ञं तम् ।।८।।

### अनुष्टुप्

उपमन्युरूवाचः
स्तुत्या तुष्टो गणेशेन्द्रयोगी तं ढुंढिराजकम् ।।
आलिंग्यं प्रेमपूर्वं तु प्रावदद्देशिकोत्तमः ।।९।।

**श्रीमद्‌गणेशयोगीन्द्राचार्या ऊचु:-**

'वत्स ढुंढीश मे शिष्य मयूरेश-कृपावशात् ।।
मत्तुल्यो गाणपाचार्यो भविष्यसि न संशय:' ।।१०।।

इति श्रीभविष्योत्तर-महापुराणे पंचगुरुविजये श्रीमद्‌गणेश-योगीन्द्राष्टकं संपूर्णम्।।

***

## श्रीमद्‌गणेश नमनाष्टक स्तोत्र

अगा हे निजानंदवासिन् सुरेशा । कृपासागरा भालचंद्रा परेशा ।।
तुला प्रार्थितो मी प्रभो विघ्ननाशा । नमस्कार माझा तुला श्रीगणेशा ।।१।।

महाविष्णु तो जन्मला त्वन्मुखात । महाशंभुही वर्णिला नेत्रजात ।।
विधि जन्म घे पासुनि नाभिदेशा । नमस्कार माझा तुला श्रीगणेशा ।।२।।

महाशक्ति झाली तुझ्या वाम अंगी । तसा सूर्यही जाहला दक्षभागी ।।
तुझे पुत्र हे पंचदेवेश ईशा । नमस्कार माझा तुला श्रीगणेशा ।।३।।

तुवां धीपते घेऊनि वेष नाना । नरांतादिकां मारिले दुर्जनांना ।।
सदा सज्जना देशी बा पूर्ण तोषा । नमस्कार माझा तुला श्रीगणेशा।।४।।

अहो राहसी इक्षुच्या सागरांत । अजा विघ्नपा लक्षलाभादितात ।।
स्वभक्तांचिया तोडी संसारपाशा । नमस्कार माझा तुला श्रीगणेशा ।।५।।

प्रिया सिद्धी बुद्धी तुझ्या दोन जाया । जगा मोहविती अनाद्यंत गाया ।।
तया आंवरी तूचिं हेरंबधीशा । नमस्कार माझा तुला श्रीगणेशा ।।६।।

मयुरेश्वरा मोरया ढुंढिराजा । विभो विघ्नपा ज्येष्ठराजा धिराजा ।।
कृपा वीतरी सेवकी ब्रह्मवेषा । नमस्कार माझा तुला श्रीगणेशा ।।७।।

अनंतापराधा क्षमावे दयाळा । स्वपादाब्ज दावी मला चंद्रभाळा ।।
पुन्हा प्रार्थना हि तुझ्या पाददेशा । नमस्कार माझा तुला श्रीगणेशा ।।८।।

**।। जय जय गणेश ।।**

***

# श्रीमद्योगीन्द्र गुरुनमनाष्टक स्तोत्र (भु.प्र.)

गणेशान जो ब्रह्मविष्णवीशतात । जगत्सृष्टिकार्यादिकां मूळभूत ।।
तया भक्तराट् योगि जो वर्णियेला । नमस्कार योगीन्द्रपादांबुजाला ।।१।।

निजानंद जे क्षेत्र मायूर नाम । तिथें राहतो योगविश्राम धाम ।।
स्वशिष्यासि जो दे मुदें चिन्महाला । नमस्कार योगीन्द्रपादांबुजाला ।।२।।

पहा सिंदुरारक्त भालप्रदेशीं । प्रसन्नें मुखें शोभला योगवेषी ।।
दिसे बद्ध पद्मासनां ध्यानमाला । नमस्कार योगीन्द्रपादांबुजाला ।।३।।

यतीन्द्र प्रकाशी खरें गाणपत्य । सुसिद्धांत जे श्रौत लोकांत सत्य ।।
मठी राहुनी उद्धरी जो जगाला । नमस्कार योगीन्द्रपादांबुजाला ।।४।।

सहस्रावधी शिष्य ज्या सेविताती । सुरेन्द्रादि की वंद्य जे पुण्यमूर्ति ।।
असे मुद्गलू घेइ तो विग्रहाला । नमस्कार योगीन्द्रपादांबुजाला ।।५।।

कली पापमूर्ति जरी हा विशाल । तरी सद्गुरु सेवनें वारितील ।।
भवाच्या भया आदरा तत्पदाला । नमस्कार योगीन्द्रपादांबुजाला ।।६।।

अनन्यें मनें भाव ठेवा भजा त्या । शरण्या जनां त्यागिना तोच सत्या ।।
तरी आठवा श्रीगणेशेन्द्रपाला । नमस्कार योगीन्द्रपादांबुजाला ।।७।।

शतें दोन अठ्ठाविशी वत्सरें जो । जगीं राहिला दिव्य तेजें न साजो ।
दुजा ज्या सरी त्या परा सद्गुरुला । नमस्कार योगीन्द्रपादांबुजाला ।।८।।

अनुष्टुप् ।। योगभोगप्रसादार्थ योगीन्द्रनमनाष्टक ।।
अर्पिले बाळ हेरंबें भक्तिभावें सदात्मक ।।९।।

**।। जय जय गणराज समर्थ ।।**

**।। श्रीमद्गणेशार्पणमस्तु ।। श्रीयोगीन्द्रपादार्पणमस्तु ।।**

***